N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** तासगांव  **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0003  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/01/2020 11:55 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरुवार

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date From (दिनांक पासून):** 02/01/2020
**Date To (दिनांक पर्यंत):** 02/01/2020
**Time From (वेळेपासून):** 19:54 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:54 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 03/01/2020  **Time (वेळ):** 11:25 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 018  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/01/2020 11:25 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 0.1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तासगांव पोलीस ठाणे गुन्हे प्रक

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** विनोद विठ्ठल देवकुळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985  **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सिध्देश्वर कलनी तासगांव ,तासगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सिध्देश्वर कलनी तासगांव ,तासगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9860409092

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राजेंद्र सखाराम थोरावडे | | | 1. अवधुत बंगला काळीवाट हरीपुर रोड, तासगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच रक्कम | 25,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 25,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब ता.03/01/2020मी विनोद विठ्ठल देवकुळे, वय 35 वर्ष व्यवसाय:- वायरमन, रा. सिध्देश्वर कलनी, तासगांव ता.तासगांव जि. सांगली. मो.नं.9860409092.मी वरील ठिकाणी माझे कुटूंबियासह राहण्यास असून, माझे लहान भावाची बायको सौ.ज्योती राहुल देवकुळे हिने माझे व माझे घरातील लोकांचे विरुध्द मारहाण करुन त्रास दिल्याची तक्रार दिलेने माझे व माझे घरातील लोकांचे विरुध्द तासगांव पोलीस ठाणेस गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हयाचा तपास तासगांव पोलीस ठाणेचे पोलीस श्री.राजेंद्र थोरावडे यांचेकडे असून गेल्या चार दिवसा पासून पोलीस श्री.थोरावडे हे मला पोलीस ठाणेमध्ये अधून मधून बोलावून घेवून मला पोलीस ठाणेमध्ये बसवून ठेवतात व तुम्हा सर्वांना अटक करणार आहे. तुझे दोन भाऊ सरकारी नोकरीमध्ये आहेत. मी त्याची नोकरी घालवणार आहे. जर तु मला एक लाख रुपये दिलेस तरच मी तुमच्या सगळयांना अटक करणार नाही व त्रास देणार नाही. तुम्हाला सहकार्य करतो व केसमधून फक्त मीच तुम्हाला वाचवू शकतो. असे म्हणून एक लाख रुपये लाच मागणी करीत असून दि.27.12.2019 रोजी थोरावडे पोलीस यांनी फोन करुन एक लाख रुपयाची मागणी केली. मी थोरावडे पोलीस यांना दि.28.12.2019 रोजी सायकांळी 5.00 वाजता भेटून त्यांचेशी नाईलाजास्तव लाचेच्या मागणी संदर्भात चर्चा करणार आहे. वगैरे मजकूरचा तक्रार अर्ज दि.28.12.2019 रोजी चौगुले साहेबाकडे दिला. त्यानंतर मी दिलेला अर्ज चौगुले साहेबांनी वाचून पाहीला. त्यानंतर चौगुले साहेबांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर चौगुले साहेबांनी मी दिलेल्या तक्रारी अर्जावरुन पोलीस राजेंद्र थोरावडे, तासगांव पोलीस ठाणे यांचेवर कारवाई करण्याचे निश्चित केले.त्यानंतर चौगुले साहेबांनी दोन पंच उपलब्ध करुन घेवून. त्यांची पंच म्हणून काम करणेस समंती घेतली. त्यानंतर दोन्ही पंचाची व माझी व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला दोन्ही पंचाना माझे तक्रारीची हकीकत थोडक्यात सांगणेस सांगीतली. त्याप्रमाणे मी त्यांना माझे तक्रारीची थोडक्यात हकीकत सांगीतली. त्यानंतर माझा तक्रारी अर्ज पंचाना वाचणेस दिला. तो त्यांनी वाचला. त्यानंतर त्यांनी मी सांगीतलेली तोंडी तक्रार व मी दिलेला तक्रारी अर्ज मजकूर एकच असल्याची खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर पंचानी सहया केल्या. त्यानंतर चौगुले साहेबांनी सही केली. त्यानंतर मी, चौगुले साहेब, दोन्ही पंच, पोहेक.भोरे, पोना कलकुटगी, पोक सागर असे खाजगी तवेरा गाडी क्रमांक एम.एच.12 सी.वाय.7403 मधुन कारवाईकामी आवश्यक साहित्य असे सोबत घेवुन कार्यालयातून 16.30 वाजता रवाना होवून कवठेएंकद मार्गे तासगांव शहराचे अलीकडे कलेज जवळ पेट्रोल पंपासमोर आल्यानंतर गाडी रोड कडेला थांबवली. त्यानंतर चौगुले साहेबांनी मला माझी मोटर सायकल घेवून येण्याबाबत सांगीतले. त्याप्रमाणे मी पेट्रोलपंपावर लावलेली माझी टीव्हीएस स्टार मोटरसायकल रजि. नं एम. एच. 10 बी.जे.3259 घेवून खाजगी तवेरा गाडी जवळ येवून माझी मोटर सायकल रोडचे कडेला पार्क करुन पुन्हा तवेरा गाडीमध्ये जावून बसलो.त्यानंतर चौगुले साहेबांनी पडताळणीचे वेळी माझे व पोलीस थोरावडे यांचेमध्ये होणारे संभाषण पुराव्याचे कामी ध्वनीमुद्रीत करण्याचे निश्चीत करुन मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्डर

व मेमरीकार्ड बाबत माहिती दिली व पडताळणी कामी मला व पंच नं.1 यांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर चौगुले साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. मी तो माझे अंगावरील पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. कांबळे यांना लोकसेवक पोलीस थोरावडे यांची भेट घेण्यास जाणेकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. मी व पंच नं.1 कांबळे असे माझेकडील मोटर सायकल वरून रवाना होवून तासगांव पोलीस ठाणे येथे जावून पार्किंगचे ठिकाणी माझी मोटर सायकल पार्क करुन पोलीस ठाणेचे पाठीमागील बाजूस थोरावडे पोलीस बसत असले खोलीत जावून त्याठिकाणी थोरावडे पोलीस यांना मी नमस्कार केला. त्यावेळी पोलीस थोरावडे यांनी पंच नं.1 यांचेकडे पाहून हे कोण आहेत असे विचारले. त्यावर मी त्यांना सर आहेत. माझ्या सोबत आलेत असे सांगीतले. त्यावेळी थोरावडे पोलीस यांनी त्यांना मी बोलावलय का असे म्हणून थोरावडे पोलीस यांनी त्यांचे हाताचा इशारा करुन बाहेर जाण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी पंच नं.1 यांना बाहेर जाणेस सांगीतले. तसे पंच नं.1 हे तेथून थोडया अंतरावर जावून थांबून राहीले. त्यावेळी थोरावडे पोलीस रागाने मला म्हणाले की, तुला बोलावलय मग कशाला पन्नासजन माणस घेवुन येतोस तुला मी सांगितलय तेवढ कर. त्यावर मी हो असे म्हणालो असता थोरावडे पोलीस हे मला म्हणाले की, तु ज्यादिवशी एकत्र बोलावशील त्यादिवशी आपण बोलु आता जा असे म्हणाले त्यावर मी त्यांना मदत करण्याबाबत विनंती केली व मी कामावर गेलो होतो म्हणुन वेळ झाल्याचे सांगितले. त्यावर थोरावडे पोलीस हे मला मी काय करु शकत नाही त्याला मला माझं काम केले पाहीजे असे म्हणाले त्यावर मी त्यांना असे नको सर मला तुमच्या शिवाय कोण आहे त्यावर थोरावडे पोलीस हे मी काय करु आता सांग ना मला जे पाहीजे आहे ते बोलु आपण असे म्हणत हाताच्या बोटाने पैश्याचा इशारा केला. व सोमवारी सगळयांना बोलाव असे म्हणाले त्यावर मी त्यांना सोमवारी सगळयांना घेवुन येतो दोन दिवस झाले तुमच्याच व्यापात आहे मी लय टेंन्शनमध्ये आहे असे सांगितले. त्यावर मी काय करु माझ्या हातात काय हाय तु सांग असे थोरावडे पोलीस मला म्हणाले. मी त्यांना मला जरा मदत करा घरातील सर्व मलाच बघावे लागते असे सांगितले. त्यावर थोरावडे पोलीस मला आता मी काय करु त्याला इलाज न्हाय तुमच्या मध्ये माझा काय संबंध हाय साक्षीदारांनी काय काय सांगितले त्याच्यावर मी बघनार माझ्या फायदयासाठी काय मला सांग फक्त आता तेवढा मला खुलासा कर असे म्हणाले. त्यावर मी त्यांना दादा काल पासुन लय टेन्शन मध्ये आलो आहे दुसरे काही नाही म्हणुनच काहीतरी करा असे म्हणालो. त्यावर थोरावडे पोलीस हाताच्या बोटाने पैशाचा इशारा करुन मला म्हणाले की, तुझ्या वकील साहेबांना सगळ्या गोष्टीची जाणीव करुन दिलीय ते आता कुठे आहेत. त्यावर मी त्यांना माहीत नसल्याचे सांगुन माझ्या सोबत आले होते त्या सरांकडे पैशे मागितले असल्याचे सांगुन मला थोडी मदत करण्याबाबत विनंती केली . त्यावर थोरावडे पोलीस कशाला मागितले पैसे मी काय मदत करणार मी काय कोर्ट हाय काय असे म्हणुन मला खिश्यात काय हाय ते बाहेर काढ असे सांगितले. त्यावर मी माझ्या खिश्यातील पाकीट, मोबाईल व रुमाल कादुन टेबलवर ठेवले असता ते बाहेर टाकीवर ठेवण्यास थोरावडे यांनी सांगितले. त्यांचे सांगणे प्रमाणे सर्व साहीत्य बाहेर टाकीवर ठेवले व पुन्हा आत गेलो. तेंव्हा थोरावडे यांनी मला तुला काय सांगितलय माणस का घेवुन येतोय सगळी मी तुम्हाला माणुसकीन बोललोय तुम्हाला त्याची कदर नाही. मी वकीलापाशी सांगितलय काय सांगायचे ते. त्यावर मी त्यांना तुम्ही जे सांगाल ते मी ऐकतो तुमचा शब्द मी एकदा डावलला नाही. तुम्ही ज्या ज्या वेळेला बोलावलाय त्यावेळी मी आलोय. तुमचा फोन राहुलला आला होता त्यावेळी आम्ही कोर्टात होतो. त्यावर थोरावडे मला म्हणाले की, मला वेळेचे महत्व आहे. मी का रिस्क घेवु मला माग कोणतर विचारणार असतय आणी तु ईथ कुणाला पण कशाला घेवुन येतोस. असे म्हणुन त्यांनी मला आमच्या गुन्हयातील कागदपत्र वाचावयास दिली व माझा मोठेपणा आहे मी अशी कुणाला कागदपत्र वाचायला देत नाही. पण तुला मी वाचायला देतोय. माझी ऐवढी दानत आहे. त्यावर मी त्यांना माझा तुमच्यावर विश्वास आहे असे म्हणालो. त्यावर थोरावडे मला म्हणाले की, तुम्हाला मी विश्वासाने फोन करतोय मला तुमच पटलेले नाही. तु बोलतोस एक आणि करतोस एक आपणाला नाही आवडल. असे म्हणुन त्यांनी त्यांच्या हाताच्या बोटाने पैशाचा इशारा करुन ऐवढा वेळ लावायचा नसतो कवा असे म्हणुन काल तु काय म्हणालास त्यावर मी थोरावडे यांना मी दहा पंधरा पर्यन्त देतो म्हंटल होतो असे सांगितले. त्यावर त्यांनी मला केस संपवायची आहे. तुलाच मनेज करावे लागतय आत तुला सांगतो त्याचीपण एक वेळ असते. एवढयात कस होणार असे म्हणाले. त्यावर मी त्यांना थोडे थोडे करुन देतो अँडजेस्ट करा लगेच होणार नाही लई रक्कम होत्या असे म्हणुन थोडे फार कमी करण्या बाबत विनंती केली. त्यावर त्यांनी माझेवर दाखल असलेल्या गुन्हयाबाबत चर्चा केली. त्यावर मी त्यांना पन्नास देतो असे म्हणालो. त्यावर त्यांनी मला एक लाख होतील त्याचे अगोदर देवुन टाक बाकीची मागणी जुळणी कर असे म्हणाले. त्यावर मी त्यांना उदया येतो असे म्हणालो. त्यावर थोरावडे यांनी मला बर ठिक आहे असे म्हणुन आज थोडतरी दे असे म्हणाले. त्यावर मी त्यांना उदया येईन असे म्हणालो त्यावर थोरावडे यांनी मला उदया कुठे अत्ताच बग की असे म्हणाले. त्यानंतर आमच्यात थोरावडे यांनी माझ्याकडे केलेल्या लाच मागणीच्या रकमेत कमी जास्त करण्याबाबत चर्चा झाली चर्चेमध्ये थोरावडे यांनी मला आता जुळणी होत्याकाय तुझी पुन्हा जुळणी करुन चालणार नाही असे म्हणाले. त्यावर मी त्यांना आता होईल तेवढ देतो असे म्हणालो. आमच्यात चर्चा चालु असताना थोरावडे यांनी माझ्याकडे दोन्ही हाताची आठ बोटे दाखवुन ऐशी हजार रुपयेची मागणी केली. त्यावर मी थोरावडे यांना आता तेवढे होत नसले बाबत सांगितले. त्यावेळी थोरावडे यांनी माझ्याकडे हाताने तीन बोटे दाखवुन आता तीस हजार कर मी कमी करतो असे म्हणुन दोन्ही हाताने सात बोटे दाखवुन सत्तर हजाराबाबत हाताने खुनावले त्यावर मी त्यांना सत्तर का असे विचारले. त्यावर त्यांनी होकारअर्थि मान हालवुन तुला पाहीजे तसा जबाब तयार करुन देतो असे सांगुन नेमके कीती वेळात ऐतोस असे विचारले. त्यावर मी थोरावडे यांना तासा भरात येतो असे सांगितले. त्यावर थोरावडे यांनी मला बर असे म्हणाले. त्यानंतर मी त्याठिकणावरुन निघुन माझे बाहेर ठेवलेले साहीत्य घेवुन तेथे थांबलेले पंच नं 1 यांना सोबत घेवुन पोलीस स्टेशनचे बाहेर आलो व माझी मोटर सायकल घेवुन चौगुले साहेब थांबले ठिकाणी आलो.त्यावेळी चौगुले साहेब यांनी माझेकडील व्हाईस रेकर्डर घेवून तो बंद करुन त्यांचे ताब्यात घेतला. पंच नं.1 श्री.कांबळे यांना घडलेली हकीकत विचारली. त्यांनी घडलेली हकीकत सांगीतली. त्यानंतर चौगुले साहेब यांनी मला हकीकत विचारली असता मी ही त्यांना घडलेली हकीकत सांगीतली.त्यानंतर मी,चौगुले साहेब व दोन्ही पंचानी व्हाईस रेकर्डर मधील संभाषण ऐकले. परंतू माझे व थोरावडे पोलीस यांचेमध्ये झाले संभाषणामध्ये लाच रक्कमेबाबत थोरावडे पोलीस यांनी नक्की किती रक्कमेची मागणी केली आहे. याबाबत स्पष्टता येत नसल्याचे समजून आले.त्यानंतर थोरावडे पोलीसांनी माझेकडे किती मागणी केलेल्या लाच रक्कमेची थोरावडे पोलीसाकडून स्पष्ट करुन घेण्याकरीता चौगुले साहेबांनी मला व पंच नं.1 यांना थोरावडे पोलीस यांची भेट घेणेकरीता पाठविणेचे ठरवून चौगुले साहेब यांनी मला व दोन्ही पंचाना व्हाईस रेकर्डर व मेमरीकार्ड बाबत माहिती दिली व पडताळणी कामी मला व पंच नं.1 यांना दिलेल्या सुचनाची उजळणी करुन दिली.त्यानंतर चौगुले साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझेकडे दिला. मी तो माझे अंगावरील पन्टचे समोरील उजवे बाजूच्या खिशामध्ये ठेवला. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. कांबळे यांना लोकसेवक पोलीस थोरावडे यांची भेट घेण्यास जाणेकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. चौगुले साहेबांनी दिले सुचने प्रमाणे मी व पंच नं 1 माझे कडील मोटर सायकल वरुन तासगाव पोलीस स्टेशन येथे गेलो तिथे पार्कीचे ठिकाणी माझी गाडी पार्क करुन मी पोलीस ठाण्यामध्ये गेला व पंच नं 1 हे पोलीस स्टेशनचे बाहेर थांबुन राहीले मी पोलीस स्टेशनमध्ये थोरावडे बसतात त्या रुममध्ये जावुन थोरावडे यांची भेट घेतली व त्यांना सत्तर हजार रुपयाची जुळणी होत नसल्याचे सांगितले त्यावर थोरावडे यांनी मला आता काय करायचे पुढच्या माणसाला काय सांगायचे तुझ्यावर काय विश्वास ठेवायचा असे म्हणाले . त्यावर मी त्यांना उदया येवु काय असे विचारले असता थोरावडे हे मला म्हणाले की, उदया तु कुठे गेलास तर तु येणार नाहीस.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): pankaj dinkar pawar
**Rank** (पद): Asst. SI (Assistant Sub-Inspector)
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)
पोलीस स्टेशन ऑफिसर
**Name** (नाव): Rajendra Sadashiv Savantre
**Rank**(पद): Inspector)
कासारवडवली पोलीस ठाणे
**No.**(सं.): BFHPS9113M